ePaper

| वर्ष - 7 । अंक -40 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | ।मंगळवार, दि. 6 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## रायगडावर अडीच लाख शिवभक्त; संभाजीराजेंकडून महत्त्वाच्या सूचना








# हु इज किंग? ओन्ली शेखर सिंग!

## पिंपरी-चिंचवडला आणखी एक पुरस्कार : तब्बल 10 कोटींची कामाई अन् सन्मान

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्तपदी शेखर सिंह यांची नियुक्ती आणि प्रशासक पदाचा कारभार मिळाल्यापासून शहराला पर्यावरण, स्मार्ट सिटीसह विविध विभागांचे महत्त्वपूर्ण पुरस्कार प्राप्त झाले. प्रशासनावर प्रचंड वचक आणि दरारा यामुळे शहराची वाटचाल प्रगतीच्या दिशेने सुरू आहे. प्रशासकीय राजवटीमध्ये राजकीय हस्तक्षेप होत नाही, त्यामुळेच वसुंधरा अभियानांतर्गत शहराला तब्बल १० कोटी रुपयांचा सर्वोत्तम कामगिरीचा पुरस्कार मिळाला. परिणामी, "हु इज किंग...? ओन्ली शेखर सिंग..." अशी चर्चा महापालिका आणि राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.**





महाराष्ट्र शासनाच्या माझी वसुंधरा अभियानामध्ये अमृत गटात तसेच हरित आच्छादन आणि जैवविविधता प्रकारात उच्चतम कामगिरीसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका राज्यात अव्वल ठरली आहे. याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्तेत सेच विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांच्या प्रमुख उपस्थितीत महानगरपालिकेला पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मुंबई येथे पार पडलेल्या समारंभामध्ये महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी हा पुरस्कार स्विकारला. अमृत गटातील अव्वल क्रमांकासाठी ८ कोटी रुपये रोख व प्रमाणपत्र आणि जैवविविधता प्रकारात उच्चतम कामगिरीसाठी २ कोटी रुपये रोख व प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

या पुरस्कार सोहळ्यास महानगरपालिकेच्या वतीने अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील, जितेंद्र वाघ, पर्यावरण व अभियांत्रिकी विभागाचे सहशहर अभियंता संजय कुलकर्णी, उप आयुक्त रविकिरण घोडके, स्वच्छ भारत मिशन अभियानाच्या समन्वयक सोनम देशमुख, पर्यावरण व अभियांत्रिकी विभागाचे उपअभियंता हरविंदरसिंग बन्सल, सेवानिवृत्त उद्यान अधिक्षक गोरख गोसावी आदी उपस्थित होते.

राज्यामध्ये १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीमध्ये माझी वसुंधरा अभियान ३.० राबविण्यात आले. या अभियानामध्ये १ लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या एकूण ४३ अमृत शहरांचा गट तयार करण्यात आला होता. यातील १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांच्या अमृत गटात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने अव्वल क्रमांक प्राप्त केला आहे.

अभियानामध्ये अमृत शहरांसाठी विविध प्रकारात गुण निश्चित करण्यात आले होते. यामध्ये शहरातील हरित आच्छादित आणि जैवविविधता, घनकचरा व्यवस्थापन, जलसंवर्धन व पुनरुज्जीवन, रेनवॉटर हार्वेस्टिंग, पर्यावरण पूरक मूर्तींचा प्रचार व प्रसार, शहरामध्ये एलईडी दिव्यांचा वापर, सौर उर्जेचा वापर, बायोगॅसचा वापर, अभियानाचा प्रचार व प्रसार, पर्यावरण दूतची नियुक्ती, अभियानामधील नागरिकांचा सहभाग, माझी वसुंधरा १.० व २.० अंतर्गत जगवलेल्या वृक्षांची संख्या तसेच पूर्तता आदी बाबींचा समावेश होता. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला या प्रकारांत यशस्वी कामगिरी केली आहे.

नुकताच महानगरपालिकेला ब्लूमबर्ग इनिशिएटीव्ह फॉर सायकलिंग इन्फ्रास्ट्रक्चर या जागतिक स्तरावरील पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाचा राजीव गांधी गतिमानता अभियानामध्ये राज्यामध्ये प्रथम क्रमांकाने तर शहर सौंदर्यीकरण व नागरी प्रशासनातील विविध बाबींमध्ये उत्तम कामगिरीबद्दलचा तृतीय क्रमांकाचा पुरस्कार देखील प्राप्त झाला आहे.



"शहराचा सर्वांगीण विकास करत असताना पर्यावरणाचा समतोल राखणे ही काळाची गरज असून त्यादृष्टीने महानगरपालिका नेहमीच विविध उपक्रम राबवित आलेली आहे. यामध्ये नागरिक,लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध स्वयंसेवी संस्था तसेच महानगरपालिकेच्य विविध विभागांचा मोलाचा वाटा आहे. राज्याने पुरस्काराने सन्मानित केल्यामुळे शहराच्या नावलौकिकात भर पडली असून हा सन्मान खऱ्या अर्थाने शहरवासियांचा सन्मान आहे.

**- शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक



"शहर विकासाचे उद्दिष्ट साध्य करित असताना पर्यावरणपूरक जीवनमानावर भर देणे आवश्यक आहे. सामुहिक प्रयत्न आणि नागरी सहभागामुळे या औद्योगिक नगरीला हरित नगरी बनवणे शक्य होत होणार असून या शाश्वत निरंतर प्रक्रियेत सर्वांनी सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. आयुक्त शेखर सिंह यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाने विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली. याबद्दल आयुक्त आणि प्रशासनाचे तमाम पिंपरी-चिंचवडकरांच्या वतीने अभिनंदन करतो.

**- महेश लांडगे,** शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा.

# जेजुरी बंदचा निर्णय दोन दिवसात, विश्वस्त निवडीचा वाद चिघळणार!

## निवडीविरोधात ग्रामस्थांनी विविध मार्गांनी व्यक्त केला रोष

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जेजुरी खंडोबा मंदिराच्या सात जणांच्या विश्वस्त मंडळात जेजुरीबाहेरील तब्बल पाच जणांनी नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीसाठी सहधर्मदाय आयुक्तांनी कोणते निकष लावले, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. या निवडीविरोधात ग्रामस्थांनी आपला रोष विविध मार्गांनी व्यक्त केला. सध्या जेजुरीत ग्रामस्थांचे चक्री उपोषण सुरू आहे.**



या उपोषणाचा आज सोमवारी (ता. ५ जून) अकरावा दिवस आहे. दरम्यान, सोमवारी सायंकाळी ग्रामस्थांची एक महत्वाची बैठक पार पडली. यावेळी जेजुरी बंद ठेवण्याबाबत चर्चा करण्यात आली आहे. मात्र याबाबत अंतिम निर्णय दोन दिवसात होणार असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

जेजुरीबाहेरील जास्त विश्वस्तांची निवड केल्याने जेजुरीकर आक्रमक झाले आहेत. या निवडविरोधात ग्रामस्थांनी यापूर्वी पुणे-पंढरपूर महामार्गावर रास्तारोको आंदोलन केले. सहधर्मदाय आयुक्तांना निवेदन दिले. जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन केले. जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांना निवदेन दिले आहे. या विश्वस्तमंडळावर जास्तीत जास्त जेजुरीकरांची निवड होणे गरजेचे असल्याचा दावा ग्रामस्थ करीत आहेत.

आपली मागणी मान्य होत नाही तोपर्यंत जेजुरीत चक्री उपोषणाचा मार्ग आंदोलकांनी आवलंबला आहे. दरम्यान, जेजुरीत मुक्कामी असलेल्या संत ज्ञानेश्वर महारांजांच्या पालखीची सेवा करणार नसल्याचाही इशारा जेजुरीकरांनी दिला आहे. ग्रामस्थांच्या वतीने न्यायालयीन लढाईचीही तयारी सुरू झाली आहे. सहधर्मदाय आयुक्तांकडे विश्वस्त निवडीबाबत पुनर्विचार करण्याबाबत सोमवारी (ता. ५) याचिका दाखल करण्यात आली.

दरम्यान, सोमवारी सायंकाळी जेजुरीत सर्व ग्रामस्थांची एकत्रित बैठक पार पडली. या बैठकीला ग्रामस्थांसह पुजारी, व्यापारी, दुकानचालक, सर्व पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी जेजुरी बेमुदत बंद ठेवण्याबाबत चर्चा झाली. मात्र दोन दिवसात पुन्हा एक बैठक घेऊन त्यावर अंतिम निर्णय घेण्यात येणार असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. जेजुरीबंद झाली तर येथे येणाऱ्या भाविकांवर मोठा परिणाम होणार आहे. त्यामुळे जेजुरीकर अंतिम निर्णय काय घेणार याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

### पुनर्विचार याचिका दाखल

» जेजुरी खंडोबा मंदिराच्या सात जणांच्या विश्वस्त मंडळात जेजुरीबाहेरील तब्बल पाच जणांनी नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीविरोधात ग्रामस्थांनी आपला रोष विविध मार्गांनी व्यक्त केला. सध्या जेजुरीत ग्रामस्थांचे चक्री उपोषण सुरू केले आहे. दरम्यान, सोमवारी (ता. ५ जून) या विश्वस्त निवडीचा पुनर्विचार करण्याबाबत याचिका दाखल करण्यात आली आहे. जेजुरी मंदिर ट्रस्टच्या विश्वस्तमंडळाची निवड सहधर्मदाय आयुक्तांनी केली आहे. त्यात पाचजणांचा जेजुरीबाहेरील विश्वस्तांचा समावेश आहे. दरम्यान, विश्वस्तपदासाठी तब्बल ३५० हून अधिक ग्रामस्थांनी मुलाखती दिल्या होत्या. त्यातील फक्त एकाच ग्रामस्थाची विश्वस्तपदी निवड करण्यात आली आहे. त्यामुळे जेजुरीकरांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. विश्वस्तपदांसाठी निवड करताना सहधर्मदाय आयुक्तांनी कोणत्या निकषांचा विचार केला, असा प्रश्न ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.जेजुरीबाहेरील जास्त विश्वस्तांच्या निवडीचा जेजुरीकरांनी निषेध केला. या विश्वस्तमंडळाला सहकार्य न करण्याचा ठराव यापूर्वीच करण्यात आला आहे. ग्रामस्थांनी पुणे-पंढरपूर मार्गावर रास्तारोको आंदोलन केले. आता जेजुरीत चक्री उपोषण सुरू आहे. या उपोषणाचा आज अकरावा दिवस आहे. या निवडीविरोधात न्यायालयीन लढाई लढण्याची तयारीही आंदोलकांनी केली आहे. आता या विश्वस्तांच्या निवडीचा पुनर्विचार करवा अशी याचिका आंदोलकांच्या वतीने सहधर्मदाय आयुक्तांकडे करण्यात आली आहे.

---

# पिंपरी-चिंचवडमध्ये पटोले यांचे भावी मुख्यमंत्री म्हणून फलक!

## राज्याच्या भावी मुख्यमंत्र्यांच्या यादीत वाढ, चर्चेला उधाण

। पिंपरी । महाईन्यूज

**राज्याच्या भावी मुख्यमंत्र्यांच्या यादीत वाढ होऊ लागली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, सुप्रिया सुळे यांच्यानंतर आता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचे भावी मुख्यमंत्री म्हणून पिंपरी-चिंचवड शहरात फलक झळकले आहेत. त्यामुळे चर्चेला उधाण आले आहे.**



नाना पटोले यांच्या वाढदिवसानिमित्त शहरात काँग्रेस कार्यकर्त्यांनी फलक लावले आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, शगुन चौक आणि इंदिरा गांधी उड्डाण पुलावर असंघटित कर्मचारी कामगार संघ काँग्रेसच्या वतीने हे फलक लावण्यात आले आहेत. या फलकांवर भावी मुख्यमंत्री नानाभाऊ पटोले असा उल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे भावी मुख्यमंत्र्यांच्या यादीत आणखी एका नेत्याच्या नावाची भर पडली आहे.

विधानसभा निवडणुकीला दीड वर्षांचा अवधी आहे. महाविकास आघाडीने आतापासूनच निवडणुकीची तयारी सुरू केली आहे.

महाविकास आघाडीतील पक्ष्याच्या नेत्यांचे आतापासूनच भावी मुख्यमंत्री म्हणून फलक झळकू लागले आहेत.

---

# गहुंजे खून प्रकरण; पत्नीनेच चिरला पतीचा गळा

। पिंपरी । महाईन्यूज ।

मावळ परिसरात घडलेल्या जावयाच्या हत्याप्रकरणामध्ये मोठा ट्विस्ट आला आहे. पतीची हत्या हल्लेखोरांनी केली नसून स्वतः पत्नीनेच पतीचा गळा चिरून खून केल्याचे समोर आले आहे. खून केल्यानंतर पत्नीनेच पतीच्या अंकिता सुरज काळभोर असे पतीचा खून केलेल्या पत्नीचे नाव असून सूरज काळभोर असे खून झालेल्या पतीचे नाव आहे. पती अंकिताचा शारीरिक आणि मानसिक छळ करायचा. अंकिताला या सगळ्या गोष्टींचा प्रचंड राग येत होता. त्या रागातूनच तिने पतीचा काटा काढला. अंकिता हिचा पती तिचा शारीरिक आणि मानसिक छळ करायचा. शनिवारी रात्री ही सुरज काळभोरने पत्नी अंकिता काळभोरचा शारीरिक छळ केला. मग ती चांगलीच संतापली, या त्रासाला कंटाळून तीने पतीला संपवायचं ठरवलं. यासाठी रविवारी सकाळी अंकिताने पतीला माहेरी म्हणजे गहुंजेला न्ह्यायचं ठरवलं. आकुर्डीतील सुरजच्या घरातून ते सकाळी निघाले. तिथून दोघांनी प्रति शिर्डीत साई बाबांचं दर्शनही घेतलं. मग दुपारी गहूंजेतील घरी जायच्या आधी तेथीलचं शेतात पोहचले. तिथं पोहचल्यावर अंकिताने लघुशंकेला जायचा बहाणा केला. थोडं नजरेआड जाऊन तिने पतीवर नजर ठेवली. पती बेसावध असल्याची खात्री केली अन सोबत आणलेला चाकू बाहेर काढला. दबक्या पावलाने पती जवळ जाऊन तिने मागून चाकूने गळा चिरला आणि जमिनीवर ढकलून दिले.

# लांडे समर्थकांचा अपेक्षाभंग!

## शिरुरची उमेदवारी नाहीच : डॉ. कोल्हे यांच्या नावावर शिक्कामोर्तब


।पुणे ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**शिरुर लोकसभा मतदार संघातून आगामी लोकसभा निवडणुकीसाठी ‘शड्डू’ ठोकलेले राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे मातब्बर नेते आणि भोसरीचे माजी आमदार विलास लांडे यांना पुन्हा एकदा अपेक्षाभंग झाला आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने ‘भावी खासदार’ अशी जोरदार ब्रँडिंग केल्यानंतर, शिरुरची जागा विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनीच लढवावी, असा आदेश पक्षाध्यक्ष शरद पवार यांनी दिला आहे.**











पुण्यातील निसर्ग मंगल कार्यालय येथे शिरुर, भिवंडी आणि जालना या तीन लोकसभा मतदार संघाची आढावा बैठक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक सुरू आहे. या आढावा बैठकीला विद्यमान खासदार अमोल कोल्हे, माजी आमदार विलास लांडे,आमदार चेतन तुपे,आमदार सुनील टिंगरे यांच्या सह आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते. त्यामुळे या बैठकीमध्ये नेमकी काय चर्चा होते? याबाबत उत्सुकता होती.

मागील काही दिवसांपासून डॉ. अमोल कोल्हे हे भाजपात जाणार अशी चर्चा सुरू होती. त्यामुळे महाविकास आघाडीच्या माध्यमातून विलास लांडे शिरुरच्या उमेदवारीवर दावा करणार होते. दि. १ जून रोजी त्यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त भावी खासदार... अशा आशयाचे फ्लेक्स उभारण्यात आले. विशेष म्हणजे, शिरुरच्या उमेदवारीबाबत पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार निर्णय घेतील. पण, पक्षाने संधी दिल्यास ही निवडणूक लढवणार आणि जिंकणारसुद्धा...’’ असा दावा जाहीरपणे माजी आमदार विलास लांडे यांनी केला होता. त्यामुळे शिरुरच्या जागेवरुन कुणाला संधी मिळणार? याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले होते.

### डॉ. अमोल कोल्हे हेच राष्ट्रवादीचे उमेदवार...

» या बैठकीनंतर शिरुर लोकसभा मतदार संघातून इच्छुक उमेदवार असलेले माजी आमदार विलास लांडे म्हणाले की,शिरुर लोकसभा मतदार संघातील आढावा शरद पवार यांनी जाणून घेतला.त्यावेळी अमोल कोल्हे यांना पुन्हा शिरुरमधून निवडणूक लढवावी लागेल, असे आदेश दिले असल्याचे लांडे यांनी म्हटले आहे.

### लांडे समर्थकांची अन्यायग्रस्त मानसिकता...

» दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून २०१४ च्या निवडणुकीपासून विलास लांडे यांना ‘साईड ट्राईक’ केले जात आहे. संघटनात्मक बांधणीमध्ये लांडे यांना महत्त्वाच्या पदावर संधी दिली जाईल, अशी अपेक्षा होती.

त्यानंतर विधान परिषद निवडणुकीत लांडे यांनी वरिष्ठांच्या सांगण्यावरुन अर्ज मागे घेतला होता. त्यामुळे महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात एखाद्या चांगल्या मंडळावर संधी मिळण्याची अपेक्षा होती.

काही महिन्यांपूर्वी झालेल्या विधान परिषद निवडणुकीत पक्षाकडून संधी दिली जाईल, असा दावा केला जात होता. मात्र, राष्ट्रवादीच्या पक्षश्रेष्ठींकडून लांडे यांच्या अपेक्षांचा कायम भंग केला. त्यामुळे लांडे समर्थकांची भावना अन्यायग्रस्त झाली आहे, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

---

# मोशी परिसरातील धोकादायक वीजवाहिनी होणार भूमिगत

## » भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार
## » माजी महापौर राहुल जाधव यांच्याहस्ते कामाला सुरुवात

।पिंपरी ।महाईन्यूज

**उघड्या वीजवाहिन्यांमुळे नागरी सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर भोसरी विधानसभा मतदार संघांतर्गत उच्चदाब वीजवाहिन्या भूमिगत करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे. मोशी आणि संभाजीनगर येथील वीजवाहिनी भूमिगत करण्याचे काम सुरू केले असून, त्यामुळे ४० हजार नागरिकांना दिलासा मिळाला आहे.**



भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्याकडे देहू रस्ता, मोशी, संभाजीनगर कॉलनी १, २ आणि ३ परिसरातील घरांवरुन जाणारी उच्चदाब वीजवाहिनी भूमिगत करण्याबाबत स्थानिक नागरिकांनी मागणी केली होती. त्या अनुशंगाने पुणे जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून सुमारे १ हजार मीटर वीजवाहिनी भूमिगत करण्याच्या कामाला सुरूवात करण्यात आली.

यावेळी माजी महापौर राहुल जाधव, माजी नगरसेविका सारिका बोऱ्हाडे, अश्विनी जाधव, निलेश बोराटे, निखिल बोऱ्हाडे, नितीन बोऱ्हाडे, मंगेश हिंगणे, सागर हिंगणे, सोनम जांभूळकर, नाना सासवडे, राजेश सस्ते, गणेश सस्ते, वंदना आल्हाट, राहुल सस्ते यांच्यासह स्थानिक नागरीक यावेळी उपस्थित होते.



“समाविष्ट गावांतील वीजवाहिन्या अद्यापही उघड्यावर आहेत. पावसाळ्यात या वीजवाहिन्या तुटून किंवा वीज प्रवाहित होवून दुर्घटना होण्याची शक्यता असते. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी आमदार महेश लांडगे यांच्याकडे वीजवाहिनी भूमिगत करण्याची मागणी केली होती. त्याला सकारात्मक प्रतिसाद देत आमदार लांडगे यांनी पावसाळ्यापूर्वी सदर काम पूर्ण करण्याची सूचना प्रशासनाला केली आहे. वीज समस्या सोडवण्याबाबत आमदार लांडगे सातत्याने पाठपुरावा करीत आहेत.

- राहुल जाधव, माजी महापौर, पिंपरी-चिंचवड.

# नेट जीवींची कासावीस




नवनव्या तंत्रज्ञानाने मानवाचे जीवन अधिक सुसह्य करण्यासाठी आपल्या सभोवताल आणि घरातही असंख्य सुविधा निर्माण केल्या आहेत. त्या सुविधांचा वापर सुरुवातीला कुणालाही करता येत नाही ,हाताळणी सहज नसते ,मात्र मानवाची जिज्ञासा त्याला शांत बसू देत नसते ,काहीतरी खटपट केल्यावर मोबाईल,इंटरनेट,वाशिंग मशीन,म्युझिक सिस्टम,अँड्रॉइड टीव्ही ,लॅपटॉप किंवा इलेक्ट्रॉनिक गॅजेट याना हाताळण्याची कला एकदा सगळ्यांना अवगत होते. सगळे विश्व ज्यात सामावले आहे अश्या मोबाईलच्या असंख्य तऱ्हा लोक हाताळत असतात. अगदी तीन हजार ते तीन लाखापर्यंत मोबाईल हँडसेट सध्या बाजारात उपलब्ध आहेत. आपापल्या आर्थिक कुवतीनुसार सर्व स्तरातील लोक त्याचा वापर करायला लागले आहेत. त्याच्या वापरावरून अलीकडे श्रीमंती कळणे कठीण झाले आहे. धनाढ्य व्यक्ती साधा बटणाचा तर अगदी भिकारी पण आयफोन जवळ बाळगताना दिसतो.

तुमच्या हातातील गॅझेट ,तुमच्या वापरासाठी असताना ते तुमचा वापर कधी करायला लागतात याचा पत्ताही लागत नाही. गेल्या काही वर्षात मोबाईलचा वापर आणि मोबाईल तुमचा करीत असलेला वापर या दोन भिन्न बाबीकडे बारकाईने लक्ष दिले तर असे लक्षात येते की मोबाईल आपल्यासाठी नव्हे जणू मोबाईलसाठी आपण तत्पर असतो. जे लोक सोशल मीडियाचा अतिरेकी वापर करतात त्यांना तर जहाल व्यसन लागल्याचे लक्षात येते. गेल्या पाच वर्षात अँड्रॉइड मोबाईल मध्ये वापरता येणारे किमान दीडलाख ॲप्स प्ले स्टोअर्सवर उपलब्ध आहेत. ज्यांना त्यातले काहीतरी कळते ते सतत विविध ॲप्सचा उपयोग असंख्य कामांसाठी करीत असतात. संगीत,कला,अभिनय,धर्म,अध्यात्म



,कथा,कविता असे लाखो पर्याय लोकांना उपलब्ध करून देण्यात आले आहेत.एखाद्याला अमर्याद नेट उपलब्ध करून दिली तर त्याच्या जीवनातील काही वर्ष अशीच निघून जातील पण ॲप्स काही संपणार नाहीत.

असंख्य ॲप्सचे गाठोडे असणारा मोबाईल आपली झोप कधी उडवतो हे लक्षात येत नाही. दर मिनिटाला मोबाईल उघडून बघणारे महान लोक आपल्याच कुटुंबात असतात. चहा,दारू,तंबाखूच्या जोडीला मोबाईल आपले व्यसन कधी होऊन बसते हे कळत नाही. काही महाभाग संडासात सुद्धा मोबाईलची साथ सोडायला तयार नसतात. एखाद्या गॅझेटच्या आहारी जाणे म्हणजे दुसरे काय असते. परवा अकोल्यातील घटनेमुळे प्रशासनाने दोन दिवस इंटरनेट सेवा बंद केली होती त्या दोन दिवसात हे सगळे नेटजीवी एवढे कासावीस झाले की खायला एकवेळ नका देऊ पण नेट सुरु ठेवा अशी तडजोड करायला हा वर्ग तयार होता. इंग्रजांनी फुकटात चहा पाजून भारतीयांना असेच दिवाने करून सोडले आहे ,आज त्याचे भयंकर व्यसनात रूपांतर झाले आहे की लोक दूध नसेल तर काळे गरम पाणी मोठ्या आनंदाने पितात,दुधाशिवाय पिण्याच्या शेकडो रेसिपी चहा शौकिनांनी तयार केल्या आहेत.

व्यसन केवळ पोटात जाणाऱ्या पदार्थांचे लागू शकते असे नाही. व्यसनाचा संबंध आपल्या मेंदूशी असतो ,नजरेने बघून मेंदूत तयार होणारी रसायने आपल्याला किती उद्दीपित करतात यावर बरेच काही अवलंबून असते. पॉर्न व्हिडीओ बघताना कुतूहल म्हणून पुन्हा काहीवेळा त्याच्या वाटेला गेलेले तरुण न कळत त्याच्या आहारी जातात आणि पुढे त्यातून नव्या विकृती डोक्यात जन्माला येतात त्याच पद्धतीने मोबाईलचे व्यसन जडते. तासभर स्क्रीन बघितला नाही तर जीव कासावीस होतो,प्रचंड ओढ तयार होते ,डोके गरगरायला सुरुवात होते . मित्रहो व्यसनाची आणखी काय वेगळी लक्षणे असतात ? आपल्यासाठी मोबाईल किंवा ही गॅझेट्स आहेत आपण त्यांच्यासाठी नव्हे हे कायमचे जे लोक लक्षात ठेवतात आणि तसे वागतात त्यांच्यावर व्यसने आरूढ होताना हजारदा विचार करतात हे लक्षात घ्या. काही नवे करण्याची गरज नाही केवळ नव्याने काही गोष्टी सुरु करा.

इलेक्ट्रॉनिक गॅझेट मध्ये " स्वीचऑफ " नावाची संकल्पना काम करते. एखादे गॅझेट " हँग " झाले तर त्याला बंद काहीवेळ बंद करणे हाच एकमेव पर्याय असतो. तसेच आपलेही असते मेंदूत विचारांचा अनेकदा कल्लोळ होतो,एकाचवेळी अनेक फ्लोपी ओपन असतात ,टॅन आला की मेंदू हँग होतो अशावेळी स्वतःला " स्वीचऑफ " करणे जमायला हवे. एकांत किंवा मनाला उभारी देणारी जागा म्हणूनच आपण शोधत असतो ,पूर्वीच्या काली ध्यान धारणा या माध्यमातून त्यावर तात्पुरता उपाय पूर्वजांनी शोधला होता. आता स्वतःला " स्वीचऑफ " करून पडून राहणे आपण सुरु केले आहे. माणूस आणि गॅझेट्स दोघांनाही काहीवेळ " स्वीचऑफ" होणे आवश्यक झाले आहे. झोपेतून उठल्यावर किती तासांनी मोबाईल नावाचे संकट हातात घ्यायचे हे आता प्रत्येकाने आपापल्या गरजेनुसार ठरवून टाकले पाहिजे तरच जीवाची घालमेल आणि मानसिक अनारोग्य थांबण्याची शक्यता आहे.

## संपादकीय »

### ही तर दंडुकेशाही

***राजधानी नवी दिल्लीत नवीन संसद भवनाचा भव्य उद्घाटन सोहळा सुरू असताना, तिथून दोन किलोमीटर अंतरावर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कुस्तीपटूंना दिल्ली पोलिसांनी जबरदस्तीने उचलून नेऊन ताब्यात घेतले.***

राजधानी नवी दिल्लीत नवीन संसद भवनाचा भव्य उद्घाटन सोहळा सुरू असताना, तिथून दोन किलोमीटर अंतरावर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कुस्तीपटूंना दिल्ली पोलिसांनी जबरदस्तीने उचलून नेऊन ताब्यात घेतले. 'भारतीय कुस्ती महासंघा'चे प्रमुख आणि भारतीय जनता पक्षाचे खासदार बृजभूषण शरण सिंह यांच्या विरोधात लैंगिक अत्याचाराचा आरोप या खेळाडूंनी केला असून, सिंह यांच्या अटकेच्या मागणीसाठी ते महिन्याभरापासून 'जंतर मंतर'वर आंदोलन करीत आहेत. गेले अनेक दिवस शांततेने आंदोलन करणारे हे कुस्तीपटू 'महिला महापंचायती'साठी नव्या संसद भवनाकडे जात असताना पोलिसांनी त्यांना रोखले. त्यांना धक्काबुक्की केली आणि अक्षरश: उचलबांगडी करून त्यांना बसमध्ये बसविले. 'नव्या संसदेतून नवा भारत घडेल,' अशी आशा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उद्घाटन करताना व्यक्त केली.

**ट्रेनच्या हालचालीवर सतत लक्ष ठेवते आणि त्याचे सिग्नल पाठवत असते. या तंत्रज्ञानामुळे एकाच ट्रॅकवर दोन गाड्या येताच ही यंत्रणा दोन्ही गाड्या ठराविक अंतरावर थांबवते. दरम्यान ही यंत्रणा जर सर्व ट्रॅकवर सक्रीय झाल्यावर असा अपघात टाळता येऊ शकतो.**

## अपघात रोखण्यासाठी 'रेल्वे कवच'

ओडिशा रेल्वे अपघाताने संपूर्ण देशाला हादरवलं असून २८० हून अधिक जणांचे प्राण गेल्याच समोर आलं आहे. आतापर्यंतच्या भारतीय रेल्वेच्या अपघातांतील हा एक भीषण अपघात असून हा अपघात टाळता आला असता का? अशी विचारणा होत आहे. विरोधकांकडून हा प्रश्न विचारण्यामागील कारण आहे एक खास टेक्नोलॉजी जिचा डेमो काही दिवसांपूर्वी दाखवला गेला होता. तर रेल्वे कवच अशी टेक्नोलॉजी आहे जी रेल्वे ट्रॅकवर बसवण्यात आल्यानंतर कोणत्याही दोन ट्रेन आमने-सामने आल्यानंत आपोआप थांबतात. भारतीय रेल्वेने शून्य अपघाताचे लक्ष्य गाठण्यासाठी सुरू केलेल्या या कवच प्रकल्पाबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. दरम्यान सध्यातरी सर्व ट्रॅकवर ही योजना राबवली गेलेली नाही. अपघात झालेल्या मार्गावरही ही यंत्रणा बसवण्यात आली नसल्याची माहिती रेल्वेचे प्रवक्ते अमिताभ शर्मा यांनी दिली आहे.

रेल्वेची कवच संरक्षण यंत्रणा आहे तरी काय?

कवच ही भारतीय रेल्वेने आरडीएसओ (रिसर्च डिझाइन अँड स्टँडर्ड्स ऑर्गनायझेशन) द्वारे विकसित केलेली स्वयंचलित ट्रेन संरक्षण प्रणाली आहे. २०१२ मध्ये रेल्वेने या प्रणालीवर काम सुरू केले. त्यावेळेस या प्रकल्पाचे नाव होते. ही प्रणाली विकसित करण्यामागील भारतीय रेल्वेचे



उद्दिष्ट शून्य अपघाताचे उद्दिष्ट साध्य करणे आहे. त्याची पहिली चाचणी २०१६ मध्ये झाली. त्याचा लाईव्ह डेमोही गेल्या वर्षी दाखवण्यात आला होता.

ही प्रणाली अनेक इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा संच आहे. यामध्ये रेल्वे, ट्रॅक, रेल्वे सिग्नल यंत्रणा आणि प्रत्येक स्थानकावर एक किलोमीटर अंतरावर रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन यंत्रे बसवण्यात आली आहेत. ही प्रणाली अल्ट्रा हाय रेडिओ फ्रिक्वेन्सीद्वारे इतर घटकांशी संवाद साधते. लोको पायलटने सिग्नल पार करताच, कवच सक्रिय होते. यानंतर सिस्टम लोको पायलटला अलर्ट करते आणि नंतर ट्रेनच्या ब्रेकचा ताबा घेते. दुसरी ट्रेन रुळावर येत असल्याचे यंत्रणेला समजताच ती पहिल्या ट्रेनची हालचाल थांबवते.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# विधानसभेच्या 288 जागा लढवणार!

## अभिजीत बिचुकले : राज्याच्या पहिल्या महिला मुख्यमंत्र्याची केली घोषणा

।मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बिगबॉस फेम अभिजीत बिचुकले विविध कारणांमुळे सतत चर्चेत असतात. बिचुकले यांनी शिवसेना ( ठाकरे गट ) आमदार आदित्य ठाकरे यांच्या वरळी विधानसभा मतदासंघातून आणि पंढरपूर, कसब्यामध्ये पोटनिवडणूक लढवली होती. अशातच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यभिषेक दिनानिमित्त अभिजीत बिचुकले यांनी मोठी घोषणा केली आहे. महाराष्ट्रात विधानसभेच्या २८८ जागा लढणार असल्याचं अभिजीत बिचुकले यांनी सांगितलं आहे.**



प्रसारमाध्यमांशी बोलताना अभिजीत बिचुकले म्हणाले की, “राज्यातील मुलींना मोफत शिक्षण देण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे बालवाडी ते दहावीपर्यंत संपूर्ण शिक्षण मोफत देण्यात यावे,” अशी मागणी बिचुकले यांनी सरकारकडे केली आहे.

“राजकारणासाठी शिवाजी महाराजांचं नाव वापरता. मग, शिवाजी महाराजांचे किती गुण तुमच्यात आहेत. हा प्रश्न सर्व नेत्यांना आहे. गरज पडली की शिवाजी महाराज, महात्मा फुले आणि बाबासाहेब आंबेडकर यांचं नाव घ्यायचं,” असेही अभिजीत बिचुकले यांनी म्हटलं.

“महाराष्ट्राच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री अलंकृता बिचुकलेंच्या नेतृत्वाखाली २८८ जागा लढण्याचा संकल्प शिवाजी महाराजांच्या राज्यभिषेक दिनानिमित्त करत आहे. होतकरू आणि राज्याचा कळवळा असलेल्यांनी माझ्या नेतृत्वाखाली आमदारकीची तयारी करावी,” असे आवाहनही बिचुकले यांनी केलं.

### तेच मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत! ; ॲड. आंबेडकर

**‘बापात बाप नाही अन् लेकात लेक नाही’ अशी महाविकास आघाडीची अवस्था आहे. मुख्यमंत्रीपदाचे स्वप्न अनेकजण बघत आहेत. त्याऐवजी आघाडीने जागा वाटपावर लक्ष केंद्रित करावे, खुद्द शरद पवार महाविकास आघाडीतील जागावाटप पुढे सरकत नसल्याची खंत व्यक्त करतात, परंतु हा विषय भिजत ठेवायचा आणि दुसरीकडे मुख्यमंत्रीपदाच्या दावेदारांची चर्चा करायची हा एक ‘गेम’ सुरू आहे, त्यामागे ज्यांची चौकशी सुरू आहे तेच मुख्यमंत्रिपदाचे दावेदार दिसत आहेत, असा टोला वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी नगरमध्ये लगावला. शेवगाव येथील दंगलीच्या पार्श्वभूमीवर ॲड. आंबेडकर यांनी आज, सोमवारी जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांची भेट घेतली. वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. किसन चव्हाण यांना राजकीय दुश्मनीतून गुन्ह्यात गोवण्यात आले, घटनेच्या दिवशी ते औरंगाबादमधील कार्यक्रमात होते, हे आपण पोलीस अधीक्षकांच्या निदर्शनास आणून दिल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी ॲड. दीपक शामदिरे, विष्णू जाधव, प्रभाकर बकले, नितीन सोनवणे, पुरुषोत्तम वीर, बालाजी जगतकर, कुणाल सरोदे, प्रतीक बारसे, योगेश साठे आदी उपस्थित होते. त्यानंतर ॲड. आंबेडकर पत्रकारांशी बोलत होते.**

---

# “RSS च्या सर्व्हेने भाजपात खळबळ

## मध्य प्रदेशमध्ये…”, काँग्रेसचा मोठा दावा

। नवी दिल्ली । महाईन्यूज

**काँग्रेसने काँग्रेसला कर्नाटक विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या यशामुळे पक्षाचा आत्मविश्वास चांगलाच वाढला आहे. या निकालानंतर काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये जोरदार उत्साह पाहायला मिळत आहे. अशातच काँग्रेसने मध्य प्रदेशमधील आगामी विधानसभा निवडणुकींबाबत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा (आरएसएस) उल्लेख करत मोठा दावा केला आहे. “आरएसएसच्या सर्व्हेने भाजपात खळबळ, मध्य प्रदेशमध्ये काँग्रेसचं सरकार येत आहे”, असा मोठा दावा काँग्रेसने केला..**



काँग्रेसने म्हटलं, “मध्य प्रदेशमध्ये यावर्षीच्या शेवटी विधानसभा निवडणूक होत आहे. या निवडणुकीआधी अनेक सर्व्हे समोर आले आहेत. यात मध्य प्रदेशमध्ये काँग्रेसचं सरकार येत असल्याचं दिसत आहे. भाजपाला केवळ ५५ जागांवर समाधान मानावं लागणार आहे. काँग्रेसकडे २०१८ च्या १५ महिन्यांचा कार्यकाळाचा अनुभव आणि कमलनाथ यांच्यासारखा निर्विवाद व अनुभवी नेता आहे. हे मुद्दे घेऊन काँग्रेस जनतेसमोर जात आहे.”

“भाजपाची १८ वर्षांची देणेदारी आणि अपूर्ण घोषणांमुळे जनतेत सरकारविरोधी मोठी लाट तयार झाली आहे. मागील पाच महिन्यात मध्य प्रदेश विधानसभा निवडणुकीबाबत सहा वेगवेगळे सर्व्हे झाले आहेत. सर्व सर्व्हेमध्ये भाजपाच्या जागा सातत्याने कमी होताना दिसत आहे. इतकंच नाही, तर सर्व सर्व्हेमध्ये भाजपाचा दारूण पराभव होत असल्याचं समोर येत आहे,” असा दावा काँग्रेसने केला आहे.

### विद्यमान 60 टक्के आमदारांचं तिकीट कापावं

“हा सर्व्हे समोर आल्यानंतर मध्य प्रदेश भाजपात खळबळ उडाली आहे. तसेच विद्यमान ६० टक्के आमदारांचं तिकिट कापावं अशी सुचनाही येत आहे,” असाही दावा काँग्रेसने केला.

---

# “मोहब्बत की दुकान नाही द्वेष आणि तिरस्काराचा मेगा शॉपिंग मॉल....” राहुल गांधींवर भाजपाचा पलटवार

। पिंपरी । महाईन्यूज ।



राहुल गांधी कायमच हे म्हणताना दिसतात की, ‘मै नफरत की बाजार में मोहब्बत की दुकान खोलने आया हूँ’ या टीकेला आता भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी.नड्डा यांनी उत्तर दिलं आहे. राहुल गांधी ‘मोहब्बत की दुकान’ नाही तर द्वेष, तीरस्कार यांचा मेगा शॉपिंग मॉल चालवत आहेत असं जे. पी. नड्डांनी म्हटलं आहे.

“आपला भारत देश जेव्हा जेव्हा प्रगतीची नवी शिखरं गाठतो, जेव्हा जेव्हा भारतातल्या प्रमुखपदावर बसलेल्या व्यक्तीचा लौकिक जगभरात पोहचतो. सगळं जग जेव्हा त्यांना मानतं त्यावेळी काँग्रेसचे युवराज राहुल गांधी यांना हे सगळं पचनी पडत नाही. देशाचा गौरव वाढतो आहे हे त्यांना पटत नाही. करोना काळात जगातल्या इतर देशांच्या लसींचं त्यांनी कौतुक केलं. मात्र १०० देशांनी भारताकडून करोना प्रतिबंधक लसी घेतल्या. मात्र राहुल गांधींनी याच लसींवर प्रश्नचिन्हे उपस्थित केलं. सर्जिकल स्ट्राईकचे पुरावे राहुल गांधी मागतात, हिंदू-मुस्लिम बांधवांमध्ये तेढ निर्माण करण्याचं काम करता.

### ‘त्या’ गँगला कुणाचा पाठिंबा?

आज मी बोलतोय ते फक्त टीका करायची म्हणून म्हणत नाही. ‘अफझल हम शरमिंदा है तेरे कातील जिंदा है’ या घोषणा देणाऱ्यांना कुणी पाठिंबा दिला? ‘भारत ते टुकडे होंगे’ म्हणणाऱ्या तुकडे गँगस दुसऱ्या दिवशी कोण उभं होतं? द्वेषाचा शॉपिंग मॉल यांनी उघडला आहे हे जगाला माहित आहे. राहुल गांधी मोदींचा विरोध करता करता हे विसरतात की आपण भारत देशाचा स्वाभिमान धुळीस मिळवतो आहेत. हे तुमचं राष्ट्रीयत्व आहे का? तुम्ही काहीही बोललात तरी जगाला माहित आहे की प्रधानसेवक मोदींनी देशाला किती पुढे नेलं आहे. ” असं म्हणत नड्डा यांनी राहुल गांधींना जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे.



# नवाजुद्दीन सिद्दीकीची बायको पडली प्रेमात म्हणाली, मलाही आहे आनंदात राहण्याचा अधिकार

नवाजुद्दीन सिद्दीकी आणि त्याची पत्नी आलिया सिद्दीकी यांचा लवकरच घटस्फोट होणार आहे. या दोघांच्या नात्यात कडवटपणा आला असून ते एकमेकांपासून दूर गेले आहेत. असं असलं तरी दोघं मिळून मुलांची काळजी घेतात. दरम्यान एकाकी पडलेल्या आलियाच्या आयुष्यात पुन्हा एकदा प्रेम आलं आहे. त्याबद्दल तिनं सोशल मीडियावर पोस्ट केली आहे...

.मुंबई : बॉलिवूडचा प्रसिद्ध अभिनेता नवाजुद्दीन सिद्दीकी आणि त्याची बायको आलिया सध्या घटस्फोटाच्या प्रक्रियेतून जात असून लवकरच ते विभक्त होणार आहेत. असं असलं तरी दोघं मिळून त्यांच्या दोन्ही मुलांची काळजी घेत आहेत. आलिया आणि नवाजुद्दीन यांच्या घटस्फोटाची प्रक्रिया सुरू असताना आलियानं तिच्या सोशल मीडिया अकाउंटवर जे काही शेअर केलं ते पाहून सर्वांना आश्चर्याचा मोठा धक्का बसला आहे. आलियानं सिद्दीकीपासून विभक्त होण्याआधीच तिच्या आयुष्यात दुसरं प्रेम आलं आहे. आलियानं इन्स्टाग्रामवर तिच्या नवीन पार्टनरचा फोटो शेअर करत याची माहिती दिली आहे.

आलियानं तिच्या इन्स्टाग्रामवर फोटो शेअर केला आहे. हा फोटो शेअर करत तिनं लिहिलं आहे की, 'जे नातं मी स्वीकारलं होतं त्या नात्यातून बाहेर पडण्यासाठीमला थोडीथोडकी नाही तर १९ वर्षे लागली. माझ्या आयुष्यात मुलं ही सर्वात प्रथम आहेत आणि कायम रहातील. परंतु काही नाती अशी असतात की, जे मैत्रीपैक्षा जास्त महत्त्वाची असतात. आणि माझ्या आयुष्यात आलेलं हे नातं असंच महत्त्वाचं आहे. या नात्यामुळे मी खूप आनंदित आहे. त्यामुळे माझा हा आनंद सर्वांबरोबर वाटत आहे. का मला आनंदात राहण्याचा अधिकार नाही का?'

## आलियाच्या आयुष्यात आलं प्रेम

आलियानं याबाबत ईटाइम्सला दिलेल्या मुलाखतीमध्ये सांगितलं की, 'हो मी आता आयुष्यात पुढं गेले आहे. माझ्या त्याच्याशी असलेलं हे नातं मैत्रीपेक्षा अधिक आहे. आमच्या दोघांमध्ये कोणत्याही प्रकारची कमिटमेंट नाही असंह नाही. मला माझं आयुष्य जगायचं आहे. माझं आयुष्य मुलांबरोबर घालवायचं आहे. त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास द्यायचा नाही. परंतु आम्हा दोघांमधील नातं अत्यंत सन्मानाचं आहे. एक चांगली सवय आहे.

# तेजस्विनी पंडितला झालंय तरी काय?

**मराठी मनोरंजन विश्वातील अतिशय लोकप्रिय अभिनेत्री आणि त्याचबरोबर निर्माती म्हणून तेजस्विनी पंडीत ओळखली जाते. तिने तिच्या अभिनय आणि सौंदर्याच्या जोरावर प्रेक्षकांच्या मनात घर केलं आहे. आपल्या दर्जेदार अभिनयाने तिने यशाची उंची गाठली आहे.**

एक सोज्वळ भूमिकेचं पात्र असो किंवा 'रानबाजार' सारख्या सिरिजमधील तिचा बोल्ड अवतार. तिने सागळ्याच भूमिका चोख निभावल्या आहेत. ती सोशल मिडियावर बरीच सक्रिय असते. तिने शेअर केलेल्या एका पोस्टनं पुन्हा नेटकऱ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. तिने एक मोलाचा सल्ला दिला आहे.

कलाकारांना त्याच्या चाहत्यांच्या संपर्कात राहण्यासाठी सोशल मिडियावर नेहमीच सक्रिय असावे लागते. चाहतेही आपल्या आवडत्या कलाकारांच्या वैयक्तिक आयूष्याबद्दल जाणून घेण्यासाठी उत्सूक असतात. त्याचे फोटो आणि व्हिडिओ पाहिल्यानंतर चाहते खूश होतात आणि त्या पोस्टवर लाइक्स अन् कमेंटचा वर्षाव करतात.





# तुझ्यापेक्षाही तुझी मुलगी भारी!

**बॉलीवूडमध्ये करिश्मा कपूरनं दीड दशक चाहत्यांच्या मनावर अधिराज्य केलं. तिचा डान्स, अभिनय आणि तिचं सौंदर्य यावर चाहते फिदा होते. ९० च्या दशकामध्ये करिश्मानं वेगळी ओळख निर्माण केली होती.** आता ती तिच्या लेकीमुळे चर्चेत आली आहे. करिश्मा भलेही तिच्या ॲक्टिंगमुळे प्रेक्षकांच्या कौतूकाचा विषय असेल मात्र बऱ्याचदा ती तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळेही अनेकांच्या गप्पांचा विषय होती. बॉलीवूडमधील रागीट आणि परखड व्यक्तिमत्वाची अभिनेत्री म्हणून करिश्माकडे पाहिलं गेलं. दरम्यानच्या काळात करिश्मानं मोठ्या पडद्यापासून ब्रेक घेतला होता. फोटोग्राफर्सला करिश्माच्या फॅमिली फोटो मिळाला आणि पुन्हा एका चर्चेला सुरुवात झाली आहे. करिश्मा कपूर आणि तिची मुलगी समायरा कपूर, मुलगा कियान कपूर यांचे फोटो इंस्टावर व्हायरल झाले असून त्यावर नेटकऱ्यांनी वेगवेगळ्या कमेंटस् करायला सुरुवात केली आहे. त्यापैकी एकानं तर करिश्माला थेट तिच्या मुलीवरुन प्रतिक्रिया दिली असून त्यामध्ये करिश्मा तुझ्यापेक्षाही समायरा सुंदर आहे. अशा शब्दांत तिचं कौतूक केलं आहे.

# कॅप्टन कूलने मन जिंकलं!

## महेंद्रसिंग धोनीने फॅनची इच्छा केली पूर्ण

| लंडन |
महाईन्यूज | वृत्तसंस्था |

**धोनीचा असाच एक सुंदर व्हिडिओ सोशल जोरदार मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडिओत एमएस धोनी ट्रॅफिक सिग्नलवर अडकल्याचे दिसत आहे. मात्र, तो सेल्फी मागणाऱ्या चाहत्याला निराश करत नाही. आरसीबीसारखे संघ एका विजयासाठी गुडघे टेकतात तिथे १० फायनल आणि ५ ट्रॉफी जिंकतो त्याला धोनी म्हणतात !**



मुंबई : भारतीय संघाचा आणि आयपीएलमधील चेन्नई संघाचा यशस्वी कर्णधार महेंद्रसिंग धोनी (माही) याला आज संपूर्ण जग ओळखतं. त्याला आता 'माही', 'थाला', 'एमएसडी' अशा वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते. धोनी जिकडे जाईल, तिकडे चाहते त्याच्याभोवती गराडा घालतात. यावरुन त्याचा चाहतावर्ग किती मोठा आहे, हे दिसून येते. धोनीला फक्त भारतातच नाही, तर जगभरात देखील प्रचंड मोठा चाहतावर्ग आहे. त्याची एक झलक पाहण्यासाठी चाहते आतुरतेने वाट पाहत असतात. धोनी जेव्हा मैदानावर असतो, तेव्हा चाहत्यांचा उत्साह पाहण्यासारखा असतो. तो त्याच्या चाहत्यांचीही खूप काळजी घेतो आणि त्यांना खुश करण्याची संधीही सोडत नाही.

धोनीचा असाच एक सुंदर व्हिडिओ सोशल जोरदार मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडिओत एमएस धोनी ट्रॅफिक सिग्नलवर अडकल्याचे दिसत आहे. मात्र, तो सेल्फी मागणाऱ्या चाहत्याला निराश करत नाही.

व्हायरल होत असलेला धोनीचा हा व्हिडिओ मुंबईतील आहे. या व्हिडिओत दिसते की, तो एका ट्रॅफिक सिग्नलवर आपल्या कारमध्ये असतो आणि तेव्हाच त्याच्याजवळ एक बाईक येऊन थांबते. बाईक चालक धोनीला कारमध्ये बसल्याचे पाहून त्याच्याकडे सेल्फी घेण्याचा आग्रह धरतो. यावेळी धोनीही चाहत्याला निराश करत नाही. तो आपल्याचा कारची काच खाली करतो आणि हसत हसत चाहत्याला सेल्फी देतो. धोनीसोबत सेल्फी काढल्यानंतर चाहता भलताच खुश होतो.

चेन्नई संघाचा कर्णधार धोनी आयपीएल २०२३ हंगाम संपल्यानंतर ३१ मे रोजी मुंबईला आला होता. गुरुवारी १ जूनला त्याच्या गुडघ्याची सर्जरी झाली. स्पर्धेच्या पहिल्या सामन्यात बॉल पकडताना धोनीच्या डाव्या गुडघ्याला दुखापत झाली होती. मात्र, यानंतरही त्याने स्पर्धेतील एकही सामना चुकवला नाही आणि आपल्या संघाला तब्बल पाचव्यांदा आयपीएलची ट्रॉफी जिंकून दिली.

### लग्नपत्रिकेत छापला धोनीचा फोटो




भारतीय क्रिकेटर महेंद्रसिंग धोनी लाखो लोकांच्या हृदयाची धडकन आहे. त्याच्या चाहतावर्ग काही कमी नाही. त्याच्यासाठी काहीही करायला तयार असणारे, त्याच्या एका झलकसाठी तासनतास वाट पाहणारे असे त्याचे क्रेझी फॅन आहेत. त्यामुळे त्याच्या फॅनविषयी काही वेगळं सांगण्याची गरज नाही. सोशल मीडियावर तर त्याच्या चाहत्यांविषयीदेखील बातम्या झपाट्याने व्हायरल होतात. नुकताच धोनीचा आणखी एक जबरा फॅन पहायला मिळाला. त्याने जे केलं ते पाहून तुम्हीही डोक्याला हात लावाल. सोशल मीडियावर सध्या महेंद्रसिंग धोनी म्हणजेच माहीच्या जबऱ्या फॅनची चर्चा रंगली आहे. धोनीच्या एका चाहत्याने त्याच्या लग्नाच्या कार्डवर स्वतःचा फोटो लावण्याऐवजी धोनीचा फोटो लावला होता. त्याची ही हटके लग्नपत्रिका सध्या सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहे. व्हायरल होत असलेल्या या लग्नपत्रिकेमध्ये धोनीच्या फोटोसह जर्सी क्रमांक आणि त्याचे नाव छापण्यात आले आहे. छत्तीसगडमधील एका व्यक्तीने केलेली ही पोस्ट सध्या सर्वांचं लक्ष वेधत आहे. आतापर्यंत, वधू-वरांच्या नावांव्यतिरिक्त, तुम्ही लग्नाच्या कार्डावर त्यांच्या नातेवाईकांच्या नावांसह संपूर्ण ठिकाण आणि विवाह विधीची तारीख पाहिली असेल. मात्र एखाद्या क्रिकेटरचा फोटो असलेली लग्नपत्रिका कधी पाहिली का? धोनीचा फोटो असलेली ही लग्नपत्रिका सध्या इंटरनेटवर चांगलीच व्हायरल होत आहे.

## फ्रेंच खुली टेनिस स्पर्धा: त्सित्सिपास, रुडची आगेकूच, महिला गटात जाबेऊर, सबालेन्का, गॉफचे विजय!

### निकोलस जॅरीचा 7-6 (7-3), 7-5, 7-5 असा पराभव

| पॅरिस |
महाईन्यूज | वृत्तसंस्था |

**चौथ्या मानांकित नॉर्वेचा कॅस्पर रुड आणि पाचवा मानांकित ग्रीसचा स्टेफानोस त्सित्सिपास यांनी फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेतील पुरुष एकेरी गटाच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळवला. महिला गटात सातव्या मानांकित ट्युनिशियाची ओन्स जाबेऊर, दुसऱ्या मानांकित अरिना सबालेन्का,अमेरिकेची कोको गॉफ, ब्राझीलची बीअट्रिज हद्दाद माइआ तसेच, युक्रेनच्या एलिना स्वितोलिनाने पुढच्या फेरीतील आपले स्थान निश्चित केले.**



पुरुष एकेरीच्या चौथ्या फेरीतील सामन्यात रुडने चिलीच्या निकोलस जॅरीचा ७-६ (७-३), ७-५, ७-५ असा पराभव केला. सामान्याच्या सुरुवातीपासूनच दोन्ही खेळाडूंमध्ये चांगली चुरस पाहायला मिळाली. मात्र, रुडने अखेर बाजी मारली. तर, त्सित्सिपासने ऑस्ट्रियाच्या सेबॅस्टियन ऑफनेरला ७-५, ६-३, ६-० असे सरळ सेटमध्ये नमवले. उपांत्यपूर्व फेरीत त्सित्सिपाससमोर अग्रमानांकित स्पेनच्या कार्लोस अल्कराझचे आव्हान असेल.

महिला गटात जाबेऊरने चौथ्या फेरीत अमेरिकेच्या बर्नार्डा पेरावर ६-३, ६-१ असा विजय नोंदवला. उपांत्यपूर्व फेरीत तिच्यासमोर हद्दाद माइआचे आव्हान असेल. माइआने अन्य सामन्यात पिछाडीवरून पुनरागमन करताना स्पेनच्या सारा सोरिबेस टॉर्मोला ६-७ (३-७), ६-३, ७-५ असे पराभूत केले. सबालेन्काने अमेरिकेच्या स्लोन स्टीफन्सवर ७-६ (७-५), ६-४ असा विजय साकारला. उपांत्यपूर्व तिचा सामना स्वितोलिनाशी होईल.

## विजेतेपद मिळवण्याचे दडपण नाही; राहुल द्रविड यांचे वक्तव्य

| लंडन|
महाईन्यूज | वृत्तसंस्था |



'आयसीसी' विजेतेपदापासून दहा वर्षे दूर राहिलेल्या भारतीय संघाच्या सगळय़ा नजरा आता बुधवारपासून सुरू होणाऱ्या जागतिक कसोटी अजिंक्यपद लढतीकडे लागून आहेत. अलीकडच्या काळात भारताला 'आयसीसी' विजेतेपदाने हुलकावणी दिली आहे. मात्र, जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचा अंतिम सामना खेळताना आमच्यावर या अपयशाचे किंवा विजेतेपद मिळवण्याचे कसलेच दडपण नाही, असे भारतीय क्रिकेट संघाचे प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत सांगितले.

भारत आणि ऑस्ट्रेलिया संघांदरम्यान हा अंतिम सामना ओव्हल मैदानावर खेळवण्यात येणार आहे. जागतिक कसोटी स्पर्धेचे हे दुसरे सत्र असून, पहिल्या सत्रात विराट कोहलीच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाला न्यूझीलंडकडून पराभव पत्करावा लागला होता. त्यापूर्वी २०१४ ट्वेन्टी-२० विश्वचषक, चॅम्पियन्स करंडक (२०१७) या प्रमुख स्पर्धांच्या अंतिम फेरीत भारताला विजेतेपदाने हुलकावणी दिली होती. भारतीय संघ २०१५ आणि २०१९ विश्वचषक स्पर्धा, तसेच २०१६, २०२१ ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत दडपणाचा सामना करू शकला नव्हता.